**शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता**
**नवीन महाविद्यालयांना अंतिम मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: मान्यता-२०२६/ई-१७०७२९४/मशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक : ३० जून, २०२६.**

**संदर्भ :**
**१.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.
**२.** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मान्यता-२०२५/ई-८४०७८३/मशि-४, दिनांक १८.०९.२०२५.
**३.** शासन निर्णय क्रमांक मान्यता-२०२६/ई-१५०९०२४/मशि-४ दिनांक १५.०३.२०२६.
**४.** सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६, दिनांक १६.०६.२०२६.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ आणि संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार, संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णय दिनांक १५.०३.२०२६ अन्वये, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून नवीन महाविद्यालय सुरू करण्यास इरादापत्र प्रदान करण्यात आले आहे.

आता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (३) (च) अन्वये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी राज्य सार्वजनिक विद्यापीठांनी नवीन महाविद्यालय सुरु करण्यास अंतिम मान्यता मिळण्याबाबतचे अनुपालन अहवाल सकारात्मक शिफारशीसह शासन मान्यतेसाठी शिफारशीत केले आहेत. संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयामधील परिशिष्ट "ब" अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांनुसार सदर प्रस्तावांची तपासणी करण्यात आली. सदर तपासणीनुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (३) (छ) नुसार शासनास असलेल्या अधिकारांचा वापर करुन व संदर्भ क्र.४ येथिल अध्यादेशाद्वारे निश्चित केलेल्या सुधारित कालमर्यादेत, सोबतच्या विवरणपत्रामध्ये नमूद केलेल्या **एकूण १५ नवीन महाविद्यालयांना** शासनाने विहित केलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून **कायम विनाअनुदानित तत्वावर** अंतिम मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :**

१) सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील महाविद्यालयांची मान्यता ही शासनाच्या प्रचलित

धोरणानुसार **कायम विनाअनुदानित तत्वावर** राहील. तसेच सदर महाविद्यालयांच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे वेतन व वेतनेतर दायित्व शासनावर असणार नाही.

२) सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील नवीन महाविद्यालय / संस्थेने संबंधित विभागीय सहसंचालकांकडे ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत, असे हमीपत्र रु. ५००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टॅम्प पेपरवर सादर करावे.

३) सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील महाविद्यालयांनी संबंधित विद्यापीठाने विहित केलेल्या निकषांनुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी नेमणे आवश्यक असून, इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात व त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करावी आणि तद्नंतरच उपरोक्त अट क्र. २ मधील प्रमाणपत्र प्रमाणित करून विद्यापीठास द्यावे.

४) महाविद्यालये /संस्थेने हमीपत्र सादर केल्याशिवाय आणि तसे विभागीय सहसंचालकांचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ॲफिलिएशन ऑफ कॉलेजेस बाय युनिव्हर्सिटीज रेग्युलेशन, २००९ मध्ये महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याबाबत विहित केलेल्या निकषांची पूर्तता झाल्याशिवाय संबंधित महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याची कार्यवाही विद्यापीठाने करु नये.

५) सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील महाविद्यालयांनी कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

६) मंजूर करण्यात आलेल्या महाविद्यालये/संस्थेने सक्षम प्राधिकरणाने विहीत केलेल्या कालमर्यादेत नॅक मुल्यांकन करुन घेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी व याबाबत पाठपुरावा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठाची राहील.

७) ज्या शैक्षणिक वर्षासाठी (शैक्षणिक वर्ष २०२६-२७) महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, त्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय सुरु करणे आवश्यक आहे. संलग्निकरण किंवा इतर शिखर संस्था/ केंद्रीय नियामक मंडळे यांची परवानगी मिळण्यास विलंब झाल्यामुळे जर महाविद्यालय त्या शैक्षणिक वर्षात सुरु होऊ शकले नाही तर, त्या शैक्षणिक वर्षाच्या पुढील शैक्षणिक वर्षात (शैक्षणिक वर्ष २०२७-२८) महाविद्यालय सुरु करणे अनिवार्य राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

८) महाविद्यालयामध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करताना The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ मधील तरतुदीनुसार तसेच या संदर्भातील वेळोवेळी विहित केलेल्या निकषानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता सोयी-सुविधा निर्माण करण्यात येतील याची खातरजमा संबंधित विद्यापीठाने करावी.

९) राज्य क्रीडा व युवा धोरण, २०१२ च्या अंमलबजावणीसंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण, शासन निर्णय, दिनांक २५.०७.२०१३ मधील बाबींचे पालन करणे अनिवार्य राहील.

१०) विद्यापीठांनी प्रस्तुत शासन निर्णयाचे अवलोकन केल्याशिवाय, संलग्नता देण्याची प्रक्रिया सुरू करु नये. विद्यापीठांनी संलग्नतेबाबतचा पुर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना पाठवावा.

११) संबंधित विद्यापीठांनी व विभागीय सहसंचालकांनी मंजूर करण्यात आलेल्या नवीन महाविद्यालयांचा नियतकालिक आढावा घेऊन, सदर महाविद्यालयांमध्ये मंजूर विद्यार्थी संख्येच्या ५०% किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास, सदर महाविद्यालयांची मान्यता रद्द समजून तसे आदेश संबंधित विभागीय सहसंचालकांनी काढावेत आणि ते शासन व संबंधित विद्यापीठाकडे पाठवावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६३०२१०१३५८४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: CN = ASHOK SHANKAR MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2026.06.30 21:03:14 +05'30'

**( अशोक मांडे )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (नगरविकास, गृहनिर्माण) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

४. मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक कल्याण आणि औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,

५. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

६. मा. राज्य मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

७. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,

८. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

९. कुलसचिव, श्रीमती. नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई,

१०. कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर,

११. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर,

१२. सर्व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,

१३. संबंधित संस्था (विद्यापीठांमार्फत),

१४. निवडनस्ती (मशि-४).

**शासन निर्णय क्रमांक: मान्यता-२०२६/ई-१७०७२९४/मशि-४, दिनांक ३० जून, २०२६ सोबतचे**

# विवरणपत्र 'अ'

| अ. क्र. | क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | विद्याशाखा/ अभ्यासक्रम | बृहत आराखडयातील बिंदू/ ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **श्रीमती. नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई** | | | | | |
| १. | १. | विद्या विकास मंडळ, जामसंडे, ता. देवगड , जि. सिंधुदुर्ग, ४१६६१२ | श्रीमती निता निळकंठ दीक्षित महिला महाविद्यालय, देवगड, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग, ४१६६१२ | **विज्ञान आणि तंत्रज्ञान-** B.Sc. Home Science | देवगड, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग |
| २. | २. | सह्याद्री एज्युकेशन सोसायटी, बीड, ता., जि. बीड, ४३११२२ | मातोश्री महाविद्यालय, कुंभार पिंपळगाव, ता. घनसावंगी, जि. जालना, ४३१२११ | **मानव विज्ञान-** बी.ए. | कुंभार पिंपळगाव, ता. घनसावंगी, जि. जालना |
| ३. | ३. | मांडवे ऋषी बहुउद्देशीय संस्था, मांडवा, ता. रिसोड, जि. वाशिम, ४४४५०६ | क्रांतीज्योती महिला महाविद्यालय, मानोरा, ता. मानोरा, जि. वाशिम, ४४४०४ | **विज्ञान आणि तंत्रज्ञान-** B.Sc. Home Science | मानोरा, ता. मानोरा, जि. वाशिम |
| ४. | ४. | स्व.रामजी रुडे शिक्षण व क्रिडा बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, उमरी पठार, ता. आर्णी, जि. यवतमाळ, ४४५१०३, | वर्षा रुडे वरिष्ठ महिला महाविद्यालय, उमरी पठार, ता. आर्णी, जि. यवतमाळ, ४४५१०३, | **मानव विज्ञान-** बी.ए.<br>**विज्ञान आणि तंत्रज्ञान-** बी.एस्सी. | उमरी पठार, ता. आर्णी, जि. यवतमाळ |
| ५. | ५. | जगदंबा बहूउद्देशीय सेवाभावी संस्था, ता., जि. बीड, ४३११२२, | मातोश्री महाविद्यालय, वाडा, ता. वाडा, जि. पालघर, ४२१३०३, | **विज्ञान आणि तंत्रज्ञान-** B.Sc. Information Technology | वाडा, ता. वाडा, जि. पालघर |
| ६. | ६. | बलभिम व्यायाम शाळा,असरखेडा, ता. बदनापूर, जि. जालना,४३१२०२ | सुप्रिया वरिष्ठ महिला महाविद्यालय, वर्धा, ता. वर्धा, जि. वर्धा, ४४२००१, | **विज्ञान आणि तंत्रज्ञान-** B.Sc. Home Science | वर्धा, ता. वर्धा, जि. वर्धा |

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: CN = ASHOK SHANKAR MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2026.06.30 21:03:24 +05'30'

| अ. क्र. | क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | विद्याशाखा/ अभ्यासक्रम | बृहत आराखडयातील बिंदू/ ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७. | ७. | प्रगती बहुउद्देशीय एज्युकेशन सोसायटी, कर्नलबाग, नागपुर, ४४०००२, | श्रीमती यशोदा आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महिला महाविद्यालय, कोदामेंढी, ता. मौदा, जि. नागपूर, ४४११०६, **( सदरहू मान्यता मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. २५६२/२०२६ मधील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.)** | **मानव विज्ञान**- बी.ए. **वाणिज्य आणि व्यवस्थापन**- बी.कॉम. **विज्ञान आणि तंत्रज्ञान-** बी.एस्सी. | कोदामेंढी, ता. मौदा, जि. नागपूर |
| ८. | ८. | जन विकास बहुउद्देशिय संस्था, उमरखेड, ता. उमरखेड, यवतमाळ, ४४५२०६, | अल मुबीन सीनियर कॉलेज, पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ, ४४५२०४, | **मानव विज्ञान-** बी.ए. | पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ |
| ९. | ९. | एम. आर. बहुउद्देशीय विकास संस्था, गोंदिया, ता. जि. गोंदिया | एम. जी. महाविद्यालय, गोंदिया, ता. जि. गोंदिया | **सायन्स अँड टेक्नोलॉजी- बॅचलर ऑफ सायन्स- क्लिनीकल लेबॉरेटरी सायन्स (बी.एस्सी.सी.एल.एस) बॅचलर ऑफ सायन्स (बी.एस्सी)** | गोंदिया /माजिकपूर / सावरी, जि. गोंदिया |
| १०. | १०. | उत्कर्ष शिक्षण व बहुउद्धेशीय संस्था, जळगाव जामोद, जि. बुलढाणा,४४३४०२ | वै. सत्यभामा अजाबराव देशमुख महिला महाविद्यालय, असलगाव, ता. जळगाव जामोद, जि. बुलढाणा, ४४३४०२ | **विज्ञान आणि तंत्रज्ञान-** बी.एस्सी. **मानव विज्ञान-** बी.ए. **वाणिज्य आणि व्यवस्थापन-** बी.कॉम. | असलगाव, ता. जळगाव जामोद, जि.बुलढाणा |

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: CN = ASHOK SHANKAR MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2026.06.30 21:03:36 +05'30'

| अ. क्र. | क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | विद्याशाखा/ अभ्यासक्रम | बृहत आराखडयातील बिंदू/ ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.** | | | | | |
| ११. | १. | बहुजन हिताय बहुजन सुखाय बहुदेशीय संस्था, पावनी/धाबे, पो. धाबेटेकरी, ता.अर्जुनी-मोरगाव, जि. गोंदिया,४४१७०१, | विक्तूजी कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, गोरेगाव, ता. गोरेगाव, जि. गोंदिया, ४००१०४, | **मानव विज्ञान**- बी.ए. **वाणिज्य आणि व्यवस्थापन**- बी.कॉम. **विज्ञान आणि तंत्रज्ञान**- बी.एस्सी. | गोरेगाव, ता. गोरेगाव, जि. गोंदिया |
| १२. | २. | महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था,पुणे (एम कॉर्पोरेशन), ता. हवेली, जि. पुणे,४११०५२, | स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी, सुकळी, ता. हिंगणा, जि. नागपूर, ४४१११० | **विज्ञान आणि तंत्रज्ञान**- बी.एस्सी. | हिंगणा, ता. हिंगणा, जि. नागपूर |
| १३. | ३. | नंदनवन एज्युकेशन सोसायटी नागपूर, नागपुर शहर, नागपूर शहरी, नागपूर,४४०००९, | नंदनवन कॉलेज ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, नागपुर शहर (४४०००८), नागपूर, ४४०००८ | **विज्ञान आणि तंत्रज्ञान**- बी.एस्सी. | नागपुर शहर (४४०००८), ता. नागपुर शहर, जि. नागपुर |
| १४. | ४. | वैनगंगा बहुउद्देशिय विकास संस्था, नागपूर, नागपुर शहर, नागपूर,४४००३३, | करंजेकर विज्ञान महाविद्यालय, साकोली, ता. साकोली, भंडारा, ४४१८०२ | **विज्ञान आणि तंत्रज्ञान**- बी.एस्सी. | साकोली, ता. साकोली, जि. भंडारा, |
| **डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर** | | | | | |
| १५. | १. | श्री भगवान महावीर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बनोटी, सोयगाव, छत्रपती संभाजीनगर | श्री छत्रपती शिवाजी महाराज कला महाविद्यालय, बनोटी सोयगाव, छत्रपती संभाजीनगर | **मानव विज्ञान**- बी.ए. | बनोटी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद |

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: CN = ASHOK SHANKAR MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2026.06.30 21:03:46 +05'30'

**( अशोक मांडे )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**